# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०—२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०—२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/२२/६०१
दिनांक — ३१/५/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय —मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने दिनांक १४.०४.२०११ पासून विशेष मोहिम राबविण्याबाबत.
संदर्भ —शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.८६/२०११/१६—ब, दि. १३ एप्रिल, २०११.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष भरती मोहिम राबविण्यासंदर्भात शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.८६/२०११/१६—ब, दि. १३ एप्रिल, २०११ व शासन निर्णय क्र.पदनि—२०१०/प्र.क्र.८६/१०/वित्तीय सुधारणा—१, दि. २९ नोव्हेंबर २०१० आपल्या पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत — वरीलप्रमाणे

31/5/2011
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

**मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने दिनांक १४.४.२०११ पासून विशेष मोहीम राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १३ एप्रिल, २०११

**वाचा :** १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः असंक १०१०/ प्र.क्र.१/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५.६.२०१०.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०१०/प्र.क्र. ८३/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक २९.११.२०१०.

**प्रस्तावना** :- राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे राज्य शासनाच्या महसूली उत्पन्नाच्या तुलनेत प्रशासकीय खर्चात मोठी वाढ झाली आहे, शासनाच्या तिजोरीवर मोठा ताण आलेला आहे, व परिणामी ताण कमी करण्याच्या अनुषंगाने शासकीय खर्चावर नियंत्रण ठेवण्याची उपाययोजना म्हणून शासकीय विभाग/कार्यालये, शासन अनुदानित संस्था इत्यादीमधील गट-क व गट-ड संवर्गातील (म्हणजे ज्या पदाच्या वेतनश्रेणीतील कमाल वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार रु. ९०००/- पेक्षा कमी आहे व सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड पे रु.४३००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशी पदे) पदभरतीस दिनांक ५.६.२०१० पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी उपरोक्त क्रमांक १ येथे नमूद केलेल्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर निर्बंधामधून काही पदे वगळण्यात आलेली आहेत. उपरोक्त क्रमांक २ येथे नमूद केलेल्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये विशिष्ट प्रकरणी निर्बंधातून सूट देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत, तसेच जेथे गट-क व गट-ड संवर्गातील पदे भरण्याची तातडीची गरज आहे, अशाबाबतीत विशेष बाब म्हणून निर्बंधातून सूट देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीच्या मान्यतेने निर्बंधातून सूट मिळाल्यानंतर पदभरती लगेचच करता यावी यादृष्टीने क व ड संवर्गातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी मोहीम सुरु करण्याबाबत

तसेच गट-अ व गट-ब संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी मोहीम सुरु करण्याबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक १४.४.२०११ पासून मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या दृष्टीने :-

१) गट-अ व गट-ब संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.

२) गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्याकरिता वित्त विभागाच्या दिनांक २९.११.२०१० च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०४१३२००८०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( के. पी. बक्षी )**
**प्रधान सचिव (सेवा)**

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

शासकीय विभाग/ कार्यालयांमधील व शाासन
अनुदानीत संस्थांमधील गट-क व गट-ड
संवर्गातील पदभरतीस निर्बंध घालण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## शासन निर्णय क्र. पदनि -२०१०/प्र.क्र. ८३/१०/वित्तीय सुधारणा-१
## मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
## दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१०

**संदर्भः** (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक-१०१०/प्र.क्र.-०१/१०, वित्तीय सुधारणा-१, दि.०५/०६/१०.

**प्रस्तावना :-**

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे राज्य शासनाच्या महसुली उत्पन्नाच्या तुलनेत प्रशासकीय खर्चात मोठी वाढ झाली आहे. परिणामी शासनाच्या तिजोरीवर आलेला मोठा ताण कमी करण्यासाठी शासकीय विभाग आणि कार्यालयांतील व शासन अनुदानीत संस्थामधील गट-क व गट-ड संवर्गातील काही पदांचा अपवाद करुन पदभरतीवर १ वर्षाच्या कालावधीसाठी वरील शासन निर्णयानुसार निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने विविध शासकीय कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या पदभरती प्रक्रियेबाबत प्रशासकीय विभाग / कार्यालयाकडून या विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तसेच काही विभाग / कार्यालयांकडून त्यांचेकडे सुरु असलेल्या पदभरतीस, उपरोक्त शासन निर्णयाद्वारे घालण्यात आलेल्या निर्बंधातून वगळण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. विविध विभागाकडून / कार्यालयाकडून भरती प्रक्रियेबाबत मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनाबाबत व निर्बंधातून सूट मिळण्याच्या विनंतीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट सूचना देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तदनुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

## शासन निर्णय :-

(अ) शासन निर्णय, वित्त विभाग, दि. ०५ जून २०१० पूर्वी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेल्या प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) भरतीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे व परीक्षेचा कार्यक्रम निश्चित झालेला आहे अशा बाबतीत परीक्षा रद्द करुन भरती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी.

२) निवड यादी जाहिर करण्यात आलेली आहे, परंतु नियुक्तीचे आदेश निर्गमित झालेले नाहीत, अशा बाबतीत निवड यादीला मुदतवाढ द्यावी व त्यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना भरतीवरील निर्बंध उठल्यावर नियुक्ती दयावी.

३) परीक्षा / मुलाखती पुर्ण होऊन निवड यादी घोषित करणे बाकी आहे, अशा बाबतीत निवड यादी घोषित न करता भरती वरील निर्बंध उठेपर्यंत प्रलंबित ठेवावी.

४) दि. ०५.०६.१० पुर्वी नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, परंतु संबंधित उमेदवार रुजू झालेले नाहीत, अशा बाबतीत संबंधित उमेदवारांना रुजू होण्यास परवानगी देण्यात यावी.

५) निवड यादीतील खुल्या गटातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. मात्र आरक्षणातील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. ०५.०६.१० नंतर पुर्ण झालेली असल्याने ज्यांना नियुक्ती देण्यात आलेली नाही, अशा उमेदवारांना नियुक्ती द्यावी.

ब) शासन निर्णय वित्त विभाग दि. ०५ जून, २०१० च्या निर्बंधातून वगळण्याबाबत / विशेष बाब म्हणून पदभरतीस अनुमती देण्याप्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) दि. २२.०८.२००५ पुर्वीच्या अनुकंपा नियुक्तीच्या भरती सूचीतील पदे निर्बंधातून वगळण्यात आलेली आहेत. दिनांक २२.०८.०५ नंतरच्या अनुकंपा यादीतील उमेदवारांवरील भरती निर्बंध कायम ठेवण्यात येत आहेत.

२) नर्सेस या संवर्गात आरोग्य सेवक पुरुष व आरोग्य सेवक महिला यांचा समावेश होत असल्याने त्यांना निर्बंधातून वगळण्यात येत आहे.

३) नवीन भरती करण्याऐवजी अतिरिक्त संवर्गातील कर्मचारी उपलब्ध असल्यास त्यांना नेमणूका देण्यात याव्यात.

४) ज्या संवर्गामध्ये रिक्त पदांचा अनुशेष (रिक्त पदांची संख्या) मोठया प्रमाणावर आहे किंवा गट क व ड संवर्गातील पदे भरण्याची तातडीची गरज आहे, अशा बाबतीत रिक्त पदे भरण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाने पुर्ण समर्थनासह सादर करावा. असा प्रस्ताव तपासण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सेवा) | अध्यक्ष |
| २ | अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | संबंधित प्रशासकीय विभागाचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित प्रशासकीय विभागातील सह / उप सचिव | सदस्य सचिव |

सदर समितीने प्रस्ताव तपासून पदे भरण्यासंदर्भात शिफारस केल्यास प्रस्तावास संबंधित प्रशासकीय विभागाच्या प्रभारी मंत्र्यांची मान्यता घेऊन मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. त्यांनतर पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक **२०१०११२९११२८४१००१** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( श. ग. सातपुते )**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

*१. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र , मुंबई ४०० ०२०
*२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र , मुंबई ४०० ०२०
*३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र , नागपूर
*४. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र , नागपूर
*५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
६. सर्व राजकीय पक्षांचे कार्यालये

७. राज्यपालांचे सचिव,
८. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
९. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
१०. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
११. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
*१६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
*१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई
*१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४ अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
*२०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई
*२१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*२२. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई
*२३. प्रमुख्य न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर/ मुंबई, वांद्रे, मुंबई ४०० ०५१.
२४. उपसंचालक, लेखा व कोषागार, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
२५. उप लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, नवी मुंबई/पुणे /नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
२६. सर्व जिल्हा कोषगार अधिकारी,
२७. सर्व उप कोषागार अधिकारी.
२८. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
२९. सहकार व वस्त्रोद्योग विभाग (कार्यासन हाऊसिंग सेल, १९ -सी) मंत्रालय, मुंबई
३०. सर्व विभागीय आयुक्त.
३१. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३२. सर्व जिल्हाधिकारी.
३३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३४. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागांतील मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३५. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११० ००१
३६. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८ स्टेट एम्पोरिया इमारत खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.
३७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
३८. सर्व उपसचिव / सहसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३९. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
४०. **वित्तीय सुधारणा- १ कार्यासन संग्रहार्थ.**

**(* स्वतंत्र पत्राद्वारे )**